## अभियोग पक्षाचा सा.क्र. ०१ चा शपथेवर पुरावा.

मी याद्वारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करुन सांगते की,
माझे नांव – शंकर संभाजी कराड
वय – ५३ वर्षे, धंदा - एस.टी. चालक,
रा. चिखली , ता. अहमदपू जि. लातूर.

**<u>सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.एस. भराडीया यांच्या तर्फे सरतपास</u>**

१. मी आरोपींना ओळखत नाही. त्यांना पाहील्यास देखील मी ओळखू शकणार नाही. मी १५ वर्षापासून राज्यपरिवहन महामार्ग विभागात चालक या पदावर कार्यरत आहे. घटना दि. ३०.१२.२०१८ रोजी दुपारी ०४.०० च्या सुमारास चापोली शिवारात घडली होती. मी त्या दिवशी अहमदपूर डेपो येथे कार्यरत होतो. मी एम.एच.१४-बी.टी.-०१७२ या बसवर चालक म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी वाहक म्हणून श्रीमंगले होते. आमची बस अहमदपुर वरुन ३.०० वा. निघाली होती. चापोलीच्या शिवारात आल्यानंतर समोरुन एक ट्क आला होता. तो ट्क् माझया गाडीच्या उजव्या बाजुला दोन खिडक्यांना घासून गेला होता. त्या खिडक्या चार व पाच नंबरला होत्या.

२. त्यामुळे गाडीचा पत्रा फाटलेला होता हे मी खाली उतरुन पाहीले होते. ट्क पुढे जाऊन थांबला होता. त्यानंतर मी व वाहक हे ट्ककडे गेलो होतो. त्या गाडीतून दोन व्यक्ती उतरले होते. त्या दोघांपैकी एका व्यक्तीने माझया गाडीच्या समोर येऊन काचेवर दगड मारला होता. गाडीचे नुकसान झाले होते. साधारण चोविस हजाराचे नुकसान झाले होते. ट्कचा

क्र. एम.एच.२६-ए.डी.९४८४ असा होता. त्यानंतर आम्ही आमची गाडी घेऊन चाकूर पोलीस ठाण्यात आलो होतो व तक्रार दिली होती. आता मला ती तक्रार दाखविली, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास नि.क्र. **पी-१/पीडब्ल्यु-१/नि.क्र.-१३** देण्यात आले.

सरतपास समाप्त.

**<u>उलट तपास आरोपीं तर्फे विधीज्ञ श्री. पी.एस. बुंदराळे यांच्या मार्फत.</u>**

३. माझे शिक्षण इ. १० वी पास झाले आहे. मी पोलीसांना जबाब देतांना सांगितले नव्हते की, मी १५ वर्षापासून राज्य परिवहन महामंडळामध्ये चालक म्हणून कार्यरत होतो. पोलीस ठाण्यात ०५.३० ते ०६.०० वा. गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, अहमदपूर चापोली रस्ता खडयांचा होता. हे म्हणणे खरे आहे की, तो रस्ता अरुंद होता. हे म्हणणे खरे आहे की, जर एस.टी.चे नुकसान झाले तर त्याचे कारण दिले नसेल तर ते नुकसान चालकाला भरावे लागते. मी पोलीसांना जबाब देतांना सांगितले होते की, आमची गाडी ०३.०० वा. अहमदपूर येथून निघाली होती, ते माझया जबाबात का नमुद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

४. मी पोलीसांना जबाब देतांना सांगितले होते की, चार आणि पाच खिडकीच्या येथे गाडी घासली होती, ते माझया जबाबात का नमुद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. पोलीसांनी जबाब वाचून दाखविला होता. हे म्हणणे खरे नाही की, चापोली शिवारात घटना घडली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ट्रक चार व पाच खिडकीला घासुन गेला होता व त्यामुळे एस.टी. पत्रा फाटला होता हे मी खोटे सांगत आहे. हे

संं.फौजदारी प्रकरण क्र.२५/२०१९
शासन वि. बाबु
नि.क्र. १२

म्हणणे खरे नाही की, ट्कमधील दोघापैकी एकाने माझे गाडी समोर येऊन दगड मारुन काच फोडली होती असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गाडीचे रु. चोविस हजाराचे नुकसान झाले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, एस.टी.चे झालेले नुकसान माझेवर येऊ नये म्हणून मी खोटी तक्रार केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे व मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2025.12.03 16:54:00 +0530

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2025.12.03 16:05:58 +0530

(व्ही.एस. वाघमोडे)

दि.०३.१२.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चाकूर.